

फारूक एस काझी

# अळकाज.com

# अलफ़ाज डॉट कॉम

फ़ारूक एस् काझी

ई साहित्य प्रतिष्ठान

# अलफ़ाज डॉट कॉम

**लेखक**

फ़ारूक एस् काझी

9921380966

farukskazi82@gmail. com

**चित्रे**

योगिता धोटे, मुंबई

8983051793

**सुलेखन**

प्रवीण लोहार, मुंबई

9029299913

**ई साहित्य प्रतिष्ठान**

esahity@gmail. com

7710980841

प्रकाशन दिनांक : 21 ऑक्टोबर 2017 (अलफाजचा सातवा वाढदिवस)

अलफ़ाज डॉट कॉम

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखक व चित्रकार यांना हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेलकरून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.





या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :२१ ऑक्टोबर २०१७

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# प्रास्ताविक.

फारूक एस. काझी लिखित 'अलफाज डॉट कॉम' या पुस्तकात दहा बालकथा समाविष्ट आहेत.

या कथा एका छोट्या कुटुंबातील लाडक्या अलफाजच्या, त्याचे अब्बू, अम्मी, दादा, दादी या सर्वांच्या आहेत.

अलफाज व त्याचे अब्बू, अम्मी, दादा, दादी यांच्यातील रुसव्या-फुगव्याचे काही प्रसंग घडतात. हे प्रसंग झाडाच्या पानांवर पडलेले पाण्याचे थेंब वाऱ्याच्या हलक्याशा स्पर्शाने जमिनीवर ओघळावेत तसेच ओघळतात. अगदी अलगद.

अलफाजचं भावविश्व किती निरागस आहे हे या पुस्तकातील दोन कथांवरून लक्षात येते. 'चंद्राला बॅटरी' या कथेत अमावस्येची रात्र जवळ आल्यानंतर फिक्या पडलेल्या चंद्राला चालताना पुढचं दिसणार नाही म्हणून अलफाज त्याच्या दिशेने बॅटरीचा प्रकाश पाडतो.

अब्बू आपल्याला नेहमीच शिकवत असतात. आपल्या अब्बूला आपणही काहीतरी शिकवायला हवे म्हणून लंगडी घालायला शिकवतो. अब्बूही लंगडी घालतात.

फारूक एस. काझी यांचा अलफाज वाचकांना निश्चित आवडेल.

**रा. रं. बोराडे.**
औरंगाबाद

अर्पणपत्रिका:

“ज्यांना अम्मी अब्बूंच्या प्रेमाची पाखर लाभली नाही

अशा लेकरांना………… ”

फ़ारुकचाचू

अलफाज.....

3-4 वर्षांचा एक छोकरा.

मस्तीखोर...... बडबड्या...... प्रश्न विचारणारा.......



खोडकर..... पण तितकाच हळवा.

अशा अलफाजच्या या कहाण्या.

अलफाज डॉट कॉम..... !!

यात आहे कुटुंब अन कुटुंबातील आपलेपण....

मुलांचे आवडते दादा-दादी

वेळ देणारे अम्मी-अब्बू यात आहेत.

भाबडे प्रश्न आहेत, नात्यांना घट्ट करणारे प्रसंग आहेत.

यात खूप काही आहे.

वाचून जरूर सांगा.

तुमचाच,

**फारूकचाचू.**

फारूक एस, काझी,

नाझरा, ता. सांगोला, जि. सोलापूर. 413308

farukskazi82@gmail. com

9921380966

# अनुक्रम


झंडू बाम

चंद्राला बॅटरी

अलफाज स्टाईल लंगडी

अजून दिवस उगवला नाही

दुसरा पाऊस

सॉरी

चला चिंचा पाडू

टेडी बेअर

चुकलं चुकलं

चला पुस्तक वाचू

# झंड्‌ बाम



# झंडू बाम

अलफाजची गाडी आज घरभर फिरून फिरून शांत झाली. अम्मीला काळजी पडली होती की आज अलफाज एवढा शांत कसा ? अलफाज शांत मंजे काहीतरी गडबड निश्चितच आहे. हे आता सगळयांनाच कळू लागलं होतं.

“अरे, आज अप्पू कुठं गेलाय?” दादाजींनी हळूच विचारलं. खाटेखाली लपलेला अलफाज हे सगळं ऐकत होता. हसत होता. इतक्यात अम्मीही हाक मारू लागली.... “अरे अलफाज !! कुठ गेलाय माझं पिल्लू ? कुठं शोधू ? कहां हो बिट्टू ? ”

अलफाज खाटेखाली बसल्या बसल्या हसून सगळी मजा पाहत होता. दादाजी थकून बसले. त्यांनी ओळखलं होतं... अलफाज खाटेखाली बसलाय ते.. ते पुन्हा मजेने हाक मारत होते. आणि अलफाजचं हसू पाहून स्वत:ही खुश होत होते. दादीही ते पाहून हसत होत्या.

अम्मीने अलफाज काय करतोय हे पाहण्यासाठी खाटेखाली डोकं घातलं. खाली अंधार होता. इतक्यात अलफाज “बव्वा... !!! ” असे ओरडला. अम्मी दचकून मागे सरकली. तिच्या डोक्याला खाटेची लोखंडी पट्टी लागली. खूप दुखलं तिला... डोळ्यात टचकन पाणी आलं. अलफाजला अंधारात ते दिसलं नाही. पण अम्मी काही न बोलता निघून गेलेली त्याला खटकलं... तिने आपल्यावर रागवावं, आपला गालगुच्चा घ्यावा.. प्रेमाने गालाची पापी घ्यावी असं त्याला वाटत होतं. आपण ती पापी हाताने पुसल्यावर ती लटकेच रागावणार......... मग आपण हसायचं.... असं काहीबाही त्यानं मनात ठरवलेलं.

पण, अम्मी न बोलताच निघून गेल्याचं पाहून तो हळूच बाहेर डोकावला. आपल्या खोक्यातून टफी आपलं मुंडकं बाहेर काढून इकडचा –तिकडचा अंदाज घेतो तसंच त्याने केलं. चार पायावर चालत बाहेर आला.

“अम्मी... ऽऽऽ अम्मी.... ऽऽऽ !! ”

अशा लाडात हाका मारत तो किचनमध्ये आला.

अम्मी कोपऱ्यात डोक्याला हात लावून बसलेली. डोळ्यात पाणी.

अलफाज पहिल्यांदा अम्मीला रडताना पाहत होता.

तो लाडतच अम्मीजवळ आला....... “क्या हुआ अम्मी? ”

त्याने अम्मीची पापी घेतली.

पण अम्मीने लक्ष दिलं नाही. तिने त्याला झिडकारलं.......

“जा जवळ येऊ नकोस माझ्या..... !!! किती त्रास द्यायचा रे....... ! बोलू नकोस माझ्याशी... ”

अम्मी उठून बाहेरचे कपडे आणायला गेली.

अलफाजला वाईट वाटले.

तो अम्मी अम्मी करत खूप वेळ मागे लागला.

अम्मीची ओढणी धरून ओढली. दादाजींना सांगितलं.....

पण, काही होईना....

अम्मी काही बोलेना..

अम्मी, दादा-दादी कामात आहेत हे पाहून अलफाज हळूच आतल्या खोलीत आला...

खुर्ची ओढून लहान कपाटातील झंडू बामची बाटली काढली.

ही बाटली घरातले मोठे लोक वापरतात. मी घेऊ नये म्हणून वर ठेवतात.

सर्दी झाली की नाकाला लावतात हे औषध....

डोकं दुखायला लागलं की दादीही डोक्याला लावतात.

अलफाजने टोपण काढलं... आत औषध नव्हतच....

"चूक..... आता कसं करायचं..... ? पुरेल का एवढं आपल्याला... ? "

अलफाजला सहज प्रश्न पडला.

त्याने बोटाने बाटली पुसून घेतली... व औषध नाकाला लावलं.

ते झणझणलं तसा तसा तो गडबडला.

या गडबडीत त्याचं बोट डोळ्याला लागलं..... झालं........ मग काय...... ? ? ? अलफाजचं गाणं इतक्या जोरात सुरु झालं की बाहेर शोधणारे तिघेही आत धावत आले.

"आग लागली........ आग लागली.......... आग लागली......... "

अलफाज रडत ओरडत होता.

झाला प्रकार लक्षात आल्यावर सगळेचजण हसायला लागले.

अम्मीला हसताना पाहून अलफाजला तेवढ्यात ही बरं वाटलं... सर्वांना पाहून त्याचा आवाज जास्तच वाढला. आता शेजारी पाजारी गोळा होतात की काय असं वाटायला लागलं.

अम्मीने डोळा धुवून अलफाजला शांत केलं. सगळेजण अजून हसत होते.

अलफाज अम्मीला जाम चिकटला होता तिच्या गळयातच पडला होता. त्याने हळूच झंडू बामच्या बाटलीकडे पहिले.

तीही हसतेय असंच वाटलं त्याला.

त्याने हसून पाहताच तिने त्याला डोळा मारला.

अलफाज अजून हसला व अम्मीला चिकटला.......

रागावलेली अम्मी त्याला आता सोडणार नव्हती...

अलफाज व झंडू बामची बाटली...... दोघंही मनोमन हसत होते..........

..............................................

# चंद्राला बॅटरी



# चंद्राला बॅटरी

संध्याकाळी अब्बू घरी आल्यावर अलफाज त्यांना सोडायला तयार होत नसे. सतत सोबत. “मंग ! दिवसभर कुठं असतात ते माझ्याबरोबर..... ? ” असाच जणू त्याचा प्रश्न असतो.

अब्बूंच्या खांद्यावर झोपून रस्त्याच्या कडेने फेरफटका मारायला त्याला फार आवडायचं. दिवसभर जवळ नसलेले अब्बू संध्याकाळी फक्त आपले नि आपलेच असतात. आपण एकदम निवांतपणे त्यांच्या खांद्यावर डोकं ठेवून झोपू शकतो. तो आपला हक्कच !!

अब्बू विचारतात, “बिट्टू, आज दिवसभर काय केलस? ”

मंग आपण सांगायचं, “पाणी खेळलो, टफीला मारलं, मांजरीच्या पिल्लाबरोबर खेळलो, मस्ती केली, थोडी मातीही खाल्ली........ ” असंच काहीबाही तो बोलत रहायचा.... अब्बुना दिवसभराची हकिगत कळाली की ते त्याला एखादं गाणं गाऊन दाखवत. एखादी कहाणी ऐकवत. त्यात अधून मधून अलफाजची डायलॉगबाजी चालू असायची.

अंधार असला की अब्बू सोबत बॅटरी घेत. अलफाजला ती हवी असायची. रस्त्यावर चमकवण्यासाठी, झाडावर मारण्यासाठी........ अंधारात लपलेली घरं शोधण्यासाठी.. आणि अंधारात भीती घालण्यासाठी दडलेलं माकड दाखवण्यासाठी.. त्याला बॅटरी हवी असायची. बॅटरी रस्त्यापेक्षा आकाशाकडेच जास्त वळलेली असायची. तो काय शोधतोय काही कळायचं नाही....

अमावस्या जवळ येत होती. चंद्र जवळजवळ गायबच.... !!! अंधार जास्त होता... अब्बूनी बॅटरी घेतली. दोघं निघाले भटकायला.....

दोघांच्या गप्पा अविरत चालू होत्या. नुकतच दोघांनी मिळून एक पुस्तक वाचलं होतं. ‘प्राणी संग्रहालयाला भेट’! त्यात नुसतीच चित्रंच होती. ती अलफाजला

खूपच आवडली होती. तो सतत तेच पुस्तक वाचायला मागत होता. पुस्तकावर गप्पा मारत मारत अलफाजने बॅटरी पुन्हा आकाशाकडे वळवली.

"बिट्टू, रोडवर बॅटरी मार. आकाशाकडे कायय? "...

अलफाजने अब्बूंकडे असं पाहिलं जणू यांना काहीच कसं कळत नाही.....

"अब्बू, मी चंदामामाला बॅटरी दाखवतोय.... कित्ती अंधाराय बघा की...... !! तो कसा चालणार अंधारातनं... ? ? ? ? "

अब्बूना हसू आलं. अलफाजला अंधारातून नीट चालता यावं यासाठी अब्बू त्याला म्हणत.."बेटा, नीट उजेडातून चाल. अंधारात चालता येणार नाही. "

अलफाजलाही नेमकं तेच करायचं होतं. अंधारात चंद्राला चालता येणार नाही हे त्याला समजलं होतं. म्हणून त्याने चंद्राला बॅटरी दाखवली.


"बिट्टू, अरे चंद्राला अंधारात चालता येतं. त्याला बॅटरीची गरज नसते. आणि तुझ्या या छोट्याशा बॅटरीचा उजेड तिथवर पोचणारही नाही. "

अलफाज शांत होता. तो केवळ बॅटरी आकाशाकडे चमकवत चंद्राला शोधत होता. त्याला उजेड पाहिजे असेल न ? मोठ्याना काही कळत नाही. त्यांना एवढंही कळत नाही..... चंद्रही लहान आहे... तो अंधारातून कसा चालणार? पडला मंजे ? ?

अलफाजची बॅटरी आकाशातच फिरत होती. आणि ढगांच्याआडून चालणारा छोटा चंद्र हसतच त्या बॅटरीच्या उजेडात पुढे पुढे सरकत होता....... मस्त मजेत हसत........ हसत....... !!!!

..........................................................................................

# अलफाज स्टाईल लंगडी



# अलफाज स्टाईल लंगडी

आज रविवार. अब्बू घरीच असणार. आज नाही सोडणार त्यांना. रोज रोज ते शाळेत जातात. मुलांना शिकवायला. आणि मला तर काहीच शिकवत नाहीत. आज मीच शिकवतो त्यांना.......... पण काय शिकवणार ?........... अंगणवाडीच्या बाईंनी शिकवलेलं गाणं ? की त्यांनी शिकलेली लंगडी.... ? काय बरं शिकवू?

अलफाजच्या डोक्यात असं प्रश्नाचं वादळ उठलेलं...... अवघ्या ३ वर्षाचं वय.... उनाडपण मात्र प्रचंड ! सकाळी आग्रह करून अम्मीला त्याने पोहे करायला लावले. बसून खाल्ले. आता डोक्यात काहीतरी मस्ती खेळत होती.

“अब्बू, आज मैं तुम्हारे को सिखाउंगा...... ! ”

अब्बूना चहा पिता पिता हसू आलं. अलफाज त्यांना ना ना प्रश्न विचारून हैराणून सोडत असे. पुस्तक वाचतानाही त्याचे अनेक प्रश्न सतत धडाडत असत.

हे काय? ते काय? कशाला ? कुठं? कोण आणि बरंच काही....

आता अलफाज आपल्याला काहीतरी शिकवणार मंजे भागलच.... ! अब्बूना हसू आलं. अब्बूना घेऊन अलफाज खोलीत आला. खुर्चीवर बसायची ऑर्डर सोडून त्याने बोलायला सुरुवात केली.

“अब्बू, आज मी तुम्हाला लंगडी शिकवणारय... आमच्या अंगणवाडीच्या बाईंनी शिकवलीय. ”

असं म्हणून अलफाज लंगडी घालू लागला आणि ते पाहून अब्बू खदखदून हसू लागले. कारण अलफाज लंगडीच तशी मजेदार घालत होता. लंगडीसाठी दुमडलेला पाय मागं जाण्याऐवजी वर जाऊन पुढेच पडत होता. दोन उड्या मारून..... पाय टेकवणं....... पुन्हा दोन उड्या मारणं....... पुन्हा पाय टेकवणं... असा लंगडीचा कार्यक्रम सुरु होता.

अब्बुंची हसून हसून बोबडी वळायची वेळ आली होती.

“अब्बू, आता तुम्ही करा बरं... !! ”

झालं........ !!!! अब्बूना आता लंगडी घालावी लागणार होती. ते जाग्यावरून उठले. त्यांनी स्टेप आठवली. बरीच वर्ष झाली खेळून. मजा यायची सगळे जण मिळून खेळायचो.

अब्बूनी पाय उचलून गुडघ्यात दुमडून मागे घेतला. आणि लंगडी घालून दाखवली...... “काय जमली की नाही लंगडी....!!” अशा अविर्भावात अलफाजकडे पाहिलं.

तर तो डोळे आक्रसून अचंब्याने पाहत होता.

त्याला अब्बूंची लंगडी आवडली नाही.

“चक..... चक.... ”असं चुकचुकत त्याने अब्बुना ‘अलफाज स्टाईलमधे’ लंगडी घालून दाखवली.... अब्बू पुन्हा हसले.

“अब्बू, कुछ नहीं आता तुम्हारे को... या आता करून दाखवा..... ”

बऱ्याच प्रयत्नांनी अब्बुना लंगडी जमली एकदाची..... !!!

अलफाज खुश होता.

आपण अब्बूना लंगडी शिकवली म्हणून...

तो त्या खुशीतच अम्मी, दादीला सांगायला धावला...

अब्बू त्याच्या दुडक्या चालीकडे पाहून हसत होते.

खरंच अलफाजने त्यांना लंगडी शिकवली होती.....

......... ‘अलफाज स्टाईल’ लंगडी.....

.................................................................................

# अजून दिवस उगवला नाही



# अजून दिवस उगवला नाही

रात्रभर पाऊस पडत होता.

त्यामुळे सकाळी धुकं आणि थंडी भेटायला आलेली.

धुक्यामुळे सगळंच धूसर धूसर झालेलं.

सूरजचाचू वर आलेले तरी दिसत नव्हते...... गडप झालेले.

रविवारची सकाळ. अब्बूही आज निवांत होते.

अलफाज त्यांच्याच शेजारी झोपलेला.

त्याची छोटी रजई गुंडाळून घेतलेली त्याने अंगाभोवती.

“बिट्टू, उठ बघ सूरजचाचू आलेत भेटायला. ! ”

एकदा दोनदा सांगितल्यावर अलफाजने हळूच डोकं बाहेर काढलं.

डोळे किलकिले करून पाहिलं.

खिडकीत फक्त धुकं दिसत होतं.

अलफाज पुन्हा डोकं आत घेऊन झोपी गेला.

“उठ अलफाज. आज आपण बाहेर जाणारय तू येणारय ना? ”

बाहेर फिरायला म्हटलं की अलफाज एका पायावर तयार ! त्यामुळे तो लगेच उठेल असं अब्बूना वाटलं.

पण अलफाज उठायचं नाव घेईना.

"अब्बू झोपू द्या ना.... किती थंडी वाजतेय. बघा सुरजचाचूही रजईत दडून बसलेत. बाहेर येत नाहीत. धूरही झालाय सगळा. "

अब्बूना हसू आलं.

"अरे, तो धूर नाही. धुकंय..... "

"धुकं मंजे.... ? "

"धुकं मंजे पाण्याचे लहान लहान कण. जे हवेत तरंगतात. त्यामुळे सगळं धूसर धूसर दिसतंय. "

"असं होय.. मला झोपू द्या. बाहेर काहीच दिसत नाही. मी पडेन. "

अब्बूना हसू आलं. ते उठले. आपल्या रजईची घडी घातली.

"अब्बू उठू नका. अजून दिवस नाही उगवला. थांबा ना! "

"अरे नको. सुट्टी आहे. पण कामंही आहेत. ती कोण करणार? "

अलफाज उठायला तयार नव्हता.

ऐकतच पडल्या पडल्या अलफाजच्या डोक्यात विचार येऊ लागले होते.

आज पाववाल्याचा आवाज नाही.

पाखरांचा गोंधळ नाही ऐकू आला.

सुरजचाचू नाही आलेले तरी दिवस कसा काय उगवला?

अलफाजच्या डोक्यात सहज विचार आला.

सगळ्यांना कामं आहेत. तशी मलाही कामं आहेतच की.

काल मोडलेलं गाडीचं चाक बसवायचंय.... !!

घरट्यात पिली आहेत का? का कुणी नेली...... हे पहायचंय.....

चाफ्याची फुलं फुलली असतील. ती तोडून आणायची आहेत.

सीताफळं पिकली की नाहीत ते पाहून... ती दादींनी सांगितलीत तशी झाली असली तर तोडून आणायचीत....

डब्यात पिकू घालायचीत....

चिंचा हाताला येत नाहीत... तिथं विटांचा कट्टा करायचाय.......

खूप कामं आहेत.

आज शाळा नाही. भरपूर वेळय... आज करून टाकू ही सर्व कामं..

अलफाज झटकन उठला.

रजईची घडी घालण्याची खटपट करू लागला.

जमेना.

“अब्बू मुझे नहीं आता..... ” रडवेल्या स्वरात ओरडू लागला.

अब्बूंना अलफाजला मदत करावीच लागली.

रजई, सतरंजी, वाकळ यांची घडी घालून ठेवली.

“अरे ! पण तू उठलाच कसा ? अजून दिवस नाही उगवला..... ”

अब्बू गालातल्या गालात हसत होते... मजा पाहत होते.

“नाही, सुरजचाचूला आज सुट्टीय. तो उशिराच येणार. पण मला कामं आहेत की... ! ती कोण करणार? ”

अब्बूना.... हसू आवरलं नाही. अब्बूंच्या समोर येऊन अलफाज उभारला.... हात उंचावून म्हणाला....

“लो मुझे... ! ”

अब्बूनी अलफाजला गोदीत घेतलं.

अलफाजच्या कामाची यादी अजून सुरूच होती.

सूरजचाचू अजूनही आलेले नव्हते.

सुरजचाचूचा दिवस अजून उगवला नव्हता.

पण, अलफाजचा दिवस मात्र सुरु झाला होता....... अगदी दाट धुक्यातही...... !!!!

...........................................................................

# दुसरा पाऊस



# दुसरा पाऊस

सकाळपासून बाहेर पावसाची नुसती झिम्मड लागलेली. वातावरण ओोलसर झालेलं. हवेत गारवा होता. अलफाज खिडकीत उभारून पावसाची मजा पाहत होता. रस्त्यावरून छत्री घेऊन जाणारे लोक, गाडीवरून पावसाचा मारा चुकवत डोळ्यावर हात आडवा लावून जाणारे लोक, कुणी डोक्यावर प्लास्टिकचा कागद घेऊन जाणारे लोक...... रस्त्यात मधूनच कुठून आले कुणास ठाऊक... बेडकं इकडून तिकडे उड्या मारत होती.

डांबरी रस्ता जास्तच काळा कुळकुळीत दिसत होता. पाण्याचे थेंब पाहून फुटायचे व लहान कारंजं तयार व्हायचं. अलफाज शेतातलं भिजलेलं गवत पाहत होता. पावसामुळे दूरवरच्या बांधावरची बाभळ दिसतच नव्हती. तो डोळे चोळून पाहत होता. पण ती काही दिसत नव्हती.

संध्याकाळी झालेली. शाळेतली मुलं रेनकोट घालून घरी चालली होती. आज अल्फाजच्या हाका त्यांना ऐकू आल्या नाहीत. कारण आपण आधीच भिजलोय, थांबून नाही चालणार. सायकलीचा पायंडा मारत त्याना पटकन घर गाठायचं होतं.

“अब्बू अजून कसे आले नाहीत? ” अलफाजच्या डोक्यात प्रश्न पडून गेला. ”पावसात अडकून पडले की काय? ” अलफाज काळजीत पडला. पाहता पाहता पाऊस थांबला. अंधुकसा उजेड सगळीकडे पसरला.

अलफाज पावसात दोनदा भिजला होता. त्यामुळे त्याला कुणी जागचा हळू दिलं नाही. नाहीतर चिखलात बसून त्याचा खेळ सुरु व्हायचा..... !!

“अम्मी, अब्बू क्युं नहीं आये? भिगे क्या? ”

भिजल्यावर आपण आजारी पडतो. मग डॉक्टरांकडे जावं लागतं. ते इंजेक्शन देतात. हे सर्व त्याला माहित झालंच होतं. त्याच्या डोळ्यासमोर इंजेक्शन घेतानाचे अब्बू आले व अलफाजला हसू आले. अब्बुंची कशी मजा होईल....... असं वाटलं त्याला.... “अब्बू पण घाबरतात इंजेक्शनला.... ही ही ही ही..... !! ”

अलफाज स्वत:शीच बोलला. अम्मीने दचकून पाहिलं..

“क्या हुवा? ”

“ ही ही ही, कुछ नै.. !! ” अलफाज अजून हसतच होता.

पीप पीप पीप..... ओळखीचा हॉर्नचा आवाज आला तसा अलफाज बाहेर पळाला..... “अब्बू अब्बू...... !!! ” अशा हाका मारत....

अब्बू अजून गाडी लावताहेत तोवर हा अब्बुंच्या पायाला बिलगला.

“बिट्टू, चलो घर में बारीश आ रही है... ! ”

दोघं ही घरात आली.

“आज तो दोनदा पावसात भिजलाय;आणि अजून जायचं म्हणत होता. ”

अम्मीने आल्या आल्या तक्रार सांगायला सुरुवात केली.

अलफाज लबाडासारखा जीभ बाहेर काढून हसत होता.

अब्बुनी हात पाय धुतले. चहा घेतला.

दोघे बाहेर आले.

अल्फाजच्या मनात काय आलं कुणास ठाऊक...

“अब्बू, चला पावसात भिजू. ”

अब्बू गडबडले. पाऊस तर पूर्ण बंद झालेला.

तरी हे पोरगं पावसात भिजायचं म्हणतंय.

“बिट्टू, आता कुठाय रे पाऊस? पाऊस गेला. अब्बू असं म्हणताच अलफाज म्हणाला....

“असतो की.... दुसरा पाऊस..... !! ”

“दुसरा पाऊस? ”” अब्बू अलफाजकडेच पाहत होते.

“हो की ; चला दावतो..... !! ”

अब्बू अलफाजच्या पाठी गेले.

“मला गोदीत घ्या.... ” अलफाज अब्बूंच्या गोदीत आला.

त्याने जास्वंदीच्या झाडाची फांदी धरून हलवली. अन पटापट टपोरे थेंब झाडाचा हिरवागार वास घेऊन पडू लागले.

अब्बू अलफाजला घेऊन बाजूला झाले. पण शेवटी भिजलेच.....

अलफाज खट्याळपणे हसत होता.

मग,

चिंचेच्या झाडाखाली

मेंदीच्या झाडाखाली

नारळाच्या झाडाखाली..

दुसरा पाऊस अनुभवता अनुभवता दोघंही ओलेचिंब झाले. पूर्ण भिजून दोघंही घरात आले.

अम्मीने विचारलेच.... ”हे काय? कुठं भिजला? पाऊस तर नाहीय बाहेर... ! ”

दोघंही एकमेकाकडे पाहून हसले.

एकाच सुरात बोलले...

“आहे की..... !! दुसरा पाऊस.... !!! ”

अम्मी अचंब्याने पाहत राहिली.....

अब्बू व अलफाज आत कपडे बदलायला गेले....

बाहेर दुसरा पाऊस अजूनही पानापानातून ठिपकत होता.... !!

.............................................................................

# सॉरी



# सॉरी

अब्बू शाळेतून आले. गाडी स्टॅंडला लावताहेत न लावताहेत तोवर घरातून अलफाज व त्याच्या अम्मीचा गोंधळ कानी पडला.

त्यांना थोडं हसू आलं. आज काहीतरी मजेशीर ऐकायला मिळणार. असा अंदाज करून त्यांनी घरात पाऊल टाकलं. घरात पाऊल टाकताच अलफाज धावत धावत आला.

“अब्बू, आमडीला सांगा. ती मला सॉरी म्हणत नाही... ! ”

काय झालं असं विचारावं की नको असा विचार करून अब्बूंनी अम्मीकडे पाहिले. कोपऱ्यात भाजी निवडणाऱ्या दादीही हस्त होत्या. अब्बूनी ओळखलं. आज अलफाजने काहीतरी पराक्रम केलाय.

“आधी मी हातपाय धुवू का? मग आपण सावकाश बोलू. चालेल का? ”

अब्बूनी समजावत सांगितलं.

“नाही !! आधी तिला सॉरी म्हणायला सांगा. तिची गलती आहे. ”

अब्बू कपडे काढून बाथरूममध्ये गेले. अलफाज पाठोपाठ होताच.

“मी आज काहीही खोड केलेली नसताना तिने मला चिडवलं. नावं ठेवली. !! ” अलफाजची कॉमेंट्री सुरूच होती.

”अरे, अम्मी आहे ना ती? मग..... ? खवळली असेल. एवढं कशासाठी चिढायचं ? ”

“तिने का मला त्रास द्यायचा? मी काहीच मस्ती केली नसताना.... ते काही नाही. तिने सॉरी म्हणलंच पाहिजे...... ! ”

अलफाज आज एवढा का चिढलाय ते अब्बूना कळेना.

ते घरात आले. चहा पिता पिता अम्मीने सगळी हकीगत सांगितली.

“आज बाहेर उन्हात हरभरे वळायला ठेवलेले. दुपारी पाहते तर सगळे हरभरे विस्कटलेले. मला वाटलं याचंच कारस्थान असणार.रागावले मी पण....!! ”

“नाही अब्बू. ती झूट बात करतीय. मी काहीच केलं नाही. शेजारचा भैय्या आलेला. त्यानेच विस्कटलं सगळं. मीकाही केलं नाही. सॉरी म्हणायला सांगा तिला. ”

अब्बू हसले. अलफाज आज खऱ्यासाठी भांडत होता. त्यांनी अम्मीला सांगितलं.

“अलफाज आज एकदम करेक्ट बोलतोय. आपली चूक आहे तर आपण माफी मागायला हवी. ”

अम्मीने लगेच माफी मागितली. कान पकडून.

अलफाज हसला आणि अम्मीच्या गळयात पडून तिची पापी घेऊ लागला.

“आमडे, चूक असेल तर टू मला खवळ, पण चूक नसताना नको रे काही बोलू. ”

अम्मीने त्याचा पापा घेतला. दादीनी त्याला जवळ बोलावून त्याची मोठ्ठी पापी घेतली.

दुसऱ्या दिवशी सकाळी अलफाजला बिस्कीट हवं होतं.

“अरे, संपलेत बिस्किटे. आज फक्त दुध घे. दादांबरोबर दुपारी गावात जाऊन घेऊन ये. ”

अम्मी समजाऊन सांगत होती.

“नाही. मला आत्ताच पाहिजेत..... !!! ”

अलफाज हट्ट करू लागला. दादीनी समजावलं तरी ऐकेना.

तो रडत रडत लाथा मारू लागला. काही लाथा अम्मी व दादीना लागल्या.

अब्बू हे सर्व पाहत होते. त्यांनी अलफाजला जवळ घेतले. डोळे पुसले. तो अजूनही पाय झाडतच होता.

“माझं, शहाणं पिल्लू कुठं गेलंय रे आज? सापडेच ना..... !!! ”

“इथंच आहे. कुठंय...... !! ” अलफाज मधेच हसून बोलला.

“बिट्टू, घरात बिस्कीट आहेत का? ”

“नाहीत. ”

“दुपारी आणायचे आहेत ना? ”

“हो !! ”

“मग मघाशी बिस्कीट पाहिजे म्हणून लाथा मारून कोण रडत होतं?. माझं शहाणं पिल्लू असं कधीच करत नाही. कोण रडत होतं रे मघाशी? ”

“तुमचा बिट्टू..... !! ”

“दादी व अम्मीला लाथ कुणी मारली? ”

“मी... ”

"आपली चूक झाली तर आपण काय करतो.... ? "

"सॉरी म्हणतो..... "

असं म्हणून अलफाजने चमकून अब्बूंकडे पाहिलं. त्याला काही तरी समजलं होतं.

तो धावतच दादींकडे गेला.

"सॉरी दादी...... मैं अब कभी नही ऐसा करुंगा..... !!! "दादींनी त्याला पटकन गोदीत घेऊन त्याची पापी घेतली.

त्याने अम्मीचीही माफी मागितली.

अब्बू हे सर्व पाहून मनोमन मस्त हसत होते. अलफाज त्यांच्याजवळ आला.

"अब्बू, मैं सॉरी बोल्या हं...... !! "

अब्बूनी त्याला कवटाळलं.

"माझं, शहाणं पिल्लू सापडलं. इथंच होतं. पण मला दिसलंच नाही... "

अलफाज अब्बूला जास्तच चिकटला. सॉरीचा फंडा कामी आला........ !!!

.................................................................................

# चला चिंचा पाडू



# चला चिंचा पाडू

रविवार होता. अलफाजला अंगणवाडीला सुट्टी. आज त्यामुळे साहेब जरा उशीराच उठले. सुट्टी आहे हे पक्कं गणित होतं त्याच्या डोक्यात. आता उशिरा उठून सरळ खेळायला जावं असा विचार त्याच्या डोक्यात चमकत असावा. अलफाज उठून सरळ अंगणात गेला.

चिंचेच्या झाडाला लागलेल्या चिंचा पाहून त्याच्या चेहऱ्यावर मस्त हसू फुललेलं होतं. तोंडाला पाणी सुटलं होतं त्याच्या.

“आज मज्जा येणार !! चिंचा पडायला मिळणार...... आज फरहत दीदीपण येणारेय आज... !!! मग तर आणखीनच मज्जा येणार... !! ”

झाडाच्या खाली, आजूबाजूला जाऊन त्याने नीट पाहून घेतले. चिंचा कुठे कुठे लागल्यात ते. कुठं चिंचा वर आहेत.. कुठे खाली आहेत...... चिंचा पडायची काठीही पाहून ठेवली. गरज लागणार त्याची. घरातल्यांचं लक्ष नाही असं पाहून त्याने काठी हातात घेण्याचा प्रयत्न केला. ती लांब अन जाड होती. ती लांब अन जाड काठी त्याला काही धरता येईना. त्याच्या डोक्यात विचार आला.

“कोण मदत करेल? ”

मग एकच चेहरा समोर आला.

“दादाजी... !!!! होय, दादाजीच आपल्याला मदत करतील. नाही ऐकलं तर दादींनासांगू. त्यांचं ऐकतात दादाजी... ”

अलफाज आज जरा जास्तच खुश आहे हे घरातल्यांनी ओळखलं होतं. पण कारण काही केल्या कळेना. दात घासणं, अंघोळ, दुध –बिस्कीट खाणं.. पटकन आटपलं आणि अलफाज साच्यात चिखल [क्ले] भरून खेळू लागला. खेळणी बनवू लागला. खेळता खेळता तो गाणं गुणगुणत होता. अम्मी येता जाता हे पाहत होती. अब्बूंचं लक्ष होतं… तो काय बनवतोय याकडे.

चिखल खेळण्यातून मन भरलं तेव्हा त्याने आपली छोटी कार काढून घुईंघुईं असं आवाज काढत घरभर फेऱ्या मारायला सुरवात केली. हे करताना तो गावांची नावे घेत होता.

इतक्यात फरहत आली. पाच वर्षांची अलफाजची फुफेरी [आतेबहीण] बहीण. सोबत फुफ्फूही आलेल्या. अलफाज जाम खुश झाला. आल्या आल्या फरहतच्या गळयात पडला.

“दीदी, चल खेलने…. ! ” असा सारखा आग्रह करू लागला.

आज चिंचा पडण्याचा प्रोग्राम आहे असं त्यानं फरहतला सांगितलं.

“चल दीदी, तू चिंचा पाड. मी गोळा करतो. ”

“नको.. !! ”

‘चल, मैं हुं नां….. !! कुछ नै होगा….. !! ”

आपल्यापेक्षा मोठ्या बहिणीला अलफाज धीर देत होता.

समजावत होता.

“मला नाही येत.. “फरहतचा नकार कायम होता.

अलफाज कंटाळला.

“लकडी से गिराने का. पाईप से गिराने का. चल मै दिखाता…. ”

दोघं चिंचेच्या झाडाकडे गेले.

अलफाजने काठी हातात घेण्याचा प्रयत्न केला. पण ती जाडजूड काठी काही केल्या हलेना. तिथंच एक पाईपचा तुकडा पडलेला.

तो उचलून प्रयत्न चालू केला. पण ती वरपर्यंत जाईना.

आता झाली का पंचायत... !! दीदीसमोर इम्प्रेशन डाऊन...... !!!!!

अलफाजने फरहतला तिथंच उभं केलं आणि तो दादाजींकडे धावत गेला.

“दादाजी ऽऽऽऽ !!! ओ ऽऽऽऽ सुनोऽऽऽ ”

लाडिक आवाजावरून सर्वांनी ओळखलं.... या वाघाचं काहीतरी काम आहे.

दादाजींच्या ढेरीवर चढून त्याने त्यांचा पहिल्यांदा पापा घेतला.

गाल कुरवाळले. दाढी वाढलेली असूनही कुरकुर केली नाही.

“मेरे दादाजी... मेरे हैं..... !! ”असं म्हणून पापे घेऊ लागला.

दादाजी हसू लागले.

“क्या काम है? ” दादाजींनी विचारलं.

“इमली निकालनी है... ” गाल फुगवत अलफाज बोलला.

दादाजींना अजून हसू आलं. ते जाग्यावरून उठले.

“चलो... !! ” असं म्हणत अलफाज हसत-नाचत झाडाकडे गेला.

दादाजींनी काठीने चिंचा पडायला सुरवात केली.

अलफाज व फरहत चिंचा वेचण्यात गढून गेले.

अलफाज आपण फार मोठं काम केल्याच्या तोऱ्यात होता तर फरहत त्याच्याकडे कौतुकाने पाहत होती...

आणि मध्येच चिंचेचं एखादं बुटुक तोंडात टाकून आंबट चव लागताच "चट.... चट.... !! "असा आवाज करून खळाळून हसत होती.

अलफाजला मोठं झाल्यासारखं वाटत होतं.

चिंचा त्यालाही हसवत होत्या...... तोंडाला पाणी आणून..... !!!

...............................................................................

# टेडी बेअर



# टेडी बेअर

अलफाजच्या रडण्याचा आवाज आला. अम्मी आतून धावतच बाहेर आली. पाहते तर काय.....

अलफाज हाताला खरचटलेलं. त्यातून रक्त यायला लागलेलं.

“अम्मी ऽऽऽऽ  अम्मी ऽऽऽऽ  ए आमड्या ऽऽऽऽ !! ”

अलफाजचा आवाज वाढलेला.

अम्मी समोर येताच,

“कुठं गेली होतीस? बघ तुझ्या बछड्याला किती लागलंय... ! त्या हाफिजला मी बुकलून काढणार. नाही सोडणार त्याला. ”

अलफाजचा अवतार पाहून अम्मीला हसू आलं.

“का हसतीयस ? तुला आनंद होतोय ना? नहीं तो तू हमेशा कहती है.... ‘अब्बूना सांगून तुला चांगला धडा शिकवते. ”

अम्मीने अलफाजला जवळ घेतले.

“माझा लाडका बछडा.. ”

अम्मीचा हात झिडकारून अलफाज रुसून बसला.... !!

“बस्स !! बस्स ! आतून खुश व्हायचं अन वरून गोड गोड बोलायचं.... !! ”

अम्मी खुदकन हसली.

चिडून अलफाजने अब्बूनी आणलेला टेडीबेअर जोरात फेकला.

तो एका खिळ्यात अडकला.

अलफाजने त्याला ओढलं. त्यात ते बेअर फाटलं.

अम्मीला हे आवडलं नाही.

ती त्याला काहीच बोलली नाही. ती स्वैपाकघरात निघून गेली.

अम्मी आपल्या मागे का आली नाही ? हे पाहण्यासाठी अलफाज बाहेर आला.

अम्मी स्वैपाघरात होती.

“अम्मी ऽऽऽऽ सॉरी..... मी चिढलो तुझ्यावर. तुझ्या बछड्याला औषध नाही का लावणार? ये चल ना... !! ”

अम्मी काहीच बोलली नाही.

“ ए अम्मी ऽऽऽऽ बोल न!! चल ना !! खूप दुखतंय गं... ! ”

अम्मी काम थांबवून अलफाज कडे वळली.

“आधी माझं एक काम करशील ? ”

काम म्हटल्याबरोबर अलफाजचं तोंड कसंनुसं झालं.

नाक डोळे ओढून एकत्र आणत तो फुग-या गालांनी अम्मीकडे पाहत होता.

“आधी जा, आणि त्या टेडीबेअरला औषध लाव. ”

“का... ? ? ? ? ” हे म्हणताना अलफाजचं तोंड इतकं वाकडं झालं होतं की अम्मीला हसू आवरलं नाही.

“ हो, आधी त्या टेडीबेअरला औषध लाव. ज्याला तू मगाशी मारलं आणि जखम केली. ”

अलफाज भुवया आक्रसून अम्मीकडे पाहत होता.

“अम्मी त्यला कुठे जीव असतो. त्याला कुठं रक्त येतं ? ”

“त्याला बोलता येत नाही. त्याला जीव नाही म्हणून तू त्याच्याशी हवं तसं वागणार का?

उद्या तुला असं कुणी मारलं तर...... ? ”

“मग हाफिजने मारलंच की मला आज. !! ”

“चूक कुणाची होती ? ” अम्मीने विचारले.

“तो मला खेळू देत नव्हता. मी त्याला ढकलून खेळायला लागलो. तर त्याने मला मारलं. !! ”

अलफाज अजून चिढलेला होता.

“म्हणजे आधी चूक तुझीच होती. आणि उलट तूच हाफिजची तक्रार करत होतास. या सर्वांचा राग त्या टेडीवर काढलास.... !! बुरी बात है बेटा.. गलती खुद करो और तकलीफ दुसरों को? हा कुठला न्याय झाला... ? आणि वरून एवढा राग... ? सॉरी, तुझ्या तूच लावून घे औषध.. ”

अम्मी निघून गेली.

अलफाज हिरमुसला झाला. रडकुंडीला आला.

“अम्मी ऽऽऽऽ ए अम्मी....... अम्मीजान.... आपल्या बछडयाला माफ नाही करणार? म्हणलं ना चुकलं.... !! प्लीज माफ कर ना!! ”

अम्मीने अलफाजला जवळ घेतले.

तोंडावरून हात फिरवून दोन्ही हात कानाजवळ ठेऊन कडकड बोटं मोडली.

औषध लावलं...... अलफाज बाहेर निघून गेला.

अम्मी तिचं काम करत राहिली.

थोड्या वेळात अम्मी बाहेर डोकावली.

तेव्हा अलफाज फाटलेल्या टेडीबेअरला टाके घालत होता.... सोबत हाफिज बसलेला.

अम्मी गालातल्या गालात हसली.

तिला जे समजायचं ते तिला समजलं होतं.

मनोमन तिला आपल्या बछडयाचं खूप कौतुक वाटलं.....

..................................................................................................................

# चुकलं चुकलं







# चुकलं चुकलं

आज अंगणवाडी सुटल्यावर अलफाज घरी आला दादांबरोबर. आल्या आल्या त्याने आपल्या खेळण्यांचं खोकं काढलं. त्यात कोणतीच खेळणी ठीकठाक राहिली नव्हती. सगळ्या खेळण्यांचे पार्ट्स तुटून फुटून बाजूला काढले होते त्याने. ढोल वाजवणाऱ्या माकडाचं मुंडकं गायब होतं.

सगळ्या गाड्या बिनचाकाच्याच धावत होत्या.

मोठा रोबोट हात मोडका झालेला. त्यात सेल टाकून तो कसाबसा चालतो. त्याची तलवार मोडून पडलीय.

रिमोटवर चालणारी मोटार आता सेल टाकूनही चालत नाही. आत काय लपलंय... गाडी कशी चालते हे पाहण्यासाठी त्याने सगळी गाडी उचकटून काढली होती. त्यात सगळ्या वायरांनी जीव दिलेला होता..... !!

फुफ्फूनी आणलेली लाकडी रेल्वे मोडून त्याच्या पट्ट्या बाजूला काढल्या होत्या त्याने. त्याचा वापर करून तो घर बांधत होता. दरवाजा, छत बनवत होता.

मोठे प्लास्टिकचे डम्पर, ट्रॅक्टर. जेसीबी हे सर्व आता भंगारातही कुणी घेणार नव्हतं. तरी अजून ती खेळणी त्याच्या बॉक्समध्ये होती. तो त्यांच्याशी खेळत होता.

खेळणी का तोडली ? असं विचारलं की.....

“खेळणी ही तुटवण्यासाठीच असतात अब्बू..... ! ” हे वाक्य तो नेहमी वापरायचा.

नुकतीच एक साधीशी रेल्वे दादांनी आणली होती. त्याने आणल्या आणल्या त्याची चाके बाजूला काढली.

“का चाके काढली ? ” असं विचारलं तेव्हा तो म्हणाला.

“माझी रेल्वे रुळावरून जाणारै... त्याला चाकं नकोत.... ! ”

अलफाजच्या या उत्तरावर अम्मीने कपाळावर हात मारून घेतला होता.

आजही त्याची आपलीच मस्ती चाललेली. हात पाय धुवायला तो तयार होईना.

हात पाय धुवायला धुसफूस चाललेली.....

“अरे हात पाय धुवून तुला काय करायचंय ते कर..... अबी चल पयले हात.. पांव धो ले.... ” अम्मी सांगत होती तरी अलफाज आपल्याच मस्तीत खेळत होता. पळत होता.

“चलो आज हम लोग ‘मॅजिक बॉल’ खेलनेवाले हैं..... ! ”

दादांनी असं म्हणताच अलफाज पटकन उठला. हात पाय धुवून आला.

“चलो दादाजी.. खेलते हैं.... ! ”

मॅजिक बॉल मंजे एका प्लास्टिकच्या बॉलवर वेगवेगळे आकार कापलेले होते. त्या आकाराचे सुट्टे भाग शोधून त्या त्या आकारातून आत टाकायचे. अलफाजला ते फार आवडायचं.

दादाजी व अलफाज खेळू लागले.

“अरे, चुक्या तेरा. पुन्हा एकदा नीट आकार बघ. ”

अलफाजला दादांचा राग आला. तरी काही न बोलता तो पुन्हा प्रयत्न करू लागला.

“चूक.... चूक.... पुन्हा चुकलं.... ! ”

दादाजी पुन्हा म्हणले.

आता अलफाजला सहन नाही झालं. त्याने सरळ बॉल फेकून दिला. तो फेकताना त्याने हात वर केला तेव्हा दादीना बॉल लागला.

दादीना तो लागताच खूप वेदना झाल्या. सगळे अलफाजवर चिढले.

“का मारलं तू दादींना... बोल? ” अम्मीला राग आलेला.

“मला सारखं चूक चूक का म्हणायचं? चुकतंच की... मग सारखं सारखं चूक का म्हणायचं? ”

अलफाजला काय झालंय हे लवकर कळालं नव्हतं. दादीना लागलंय हे जेव्हा त्याच्या लक्षात आलं तेव्हा तो गडबडला.

दादींजवळ गेला.

“दादी.... क्या हुया? लग्या क्या ? ”

अलफाज कळवळला. त्याने जाणूनबुजून मारलं नव्हतं.

“दादी सॉरी.....मी असं पुन्हा नाही वागणार. माफ करो दादी. दादा मला सारखं चुकलं चुकलं का म्हणले मग ?...मी कशाला फेकला असता बॉल ? ”

“नाय रे माझ्या सोन्या. चूक तुझी नव्हती. पण आपण एवढा घुस्सा करू नये. दादांना सांगायचं की मी बरोबर करून दाखवतो. घुस्सा नहीं करना सोनू...... !!! ”

दादी समजाऊन सांगत होत्या. अलफाज समजल्यासारखा मान हलवत होता.

दादीचं बोलून झाल्यावर अलफाजने दादींची पप्पी घेतली.

“सॉरी दादी...... ! ”

दादींनी त्याला जवळ ओढून घेतला. गोदीत घेतलं.

“नाय रे सोनू.... ! ” दादींच्या डोळयात पाणी आलं. त्यांनी बोटं अलफाजच्या गालवरनं हात फिरवून आपल्या कानावर नेऊन कडकड मोडली. शेवटी त्याच्या मस्तकाची पप्पी घेतली.

अलफाज उठला.

“चलो दादा... फिर खेलेंगें.... ! ”

आता पुन्हा नव्याने खेळ सुरु झाला. दादा आता त्याला चुकलं असं म्हणत नव्हते.

उलट त्याला चूक कळून दुरुस्त होईस्तोवर वाट पाहत होते. अलफाजने सगळे आकार बरोबर लावले.

दादांनी त्याला “शाब्बास !!! ” असं म्हणताच अलफाज नाचतच घरभर फिरू लागला.

दादी त्याचा डान्स बघून गालातल्या गालात हसत होत्या. त्यांची वेदना कुठल्या कुठे पळून गेली होती.

.........................................................................................

# चला पुस्तक वाचू



# चला पुस्तक वाचू

आज अब्बूना कसलीतरी सुटी होती. त्यामुळे ते घरीच होते. अब्बू घरात असले की ते एकतर सिनेमा पाहतात, कुठेतरी बाहेर जातात किंवा दिवसभर पुस्तक वाचत बसतात हे आता अलफाजला माहित झालं होतं. आज अब्बू घरात आहेत म्हणजे आज ते दिवसभर पुस्तक वाचणार हे अलफाजने ओळखलं. अब्बू पुस्तकातल्या गोष्टी खूप सुंदर वाचून दाखवतात. अलफाजला आवडायच्या त्यांनी वाचून दाखवलेल्या गोष्टी.

अब्बू गोष्ट वाचून दाखवताना मधेच प्रश्न विचारतात, गंमत सांगतात. मलाही विचारतात. त्यामुळे खूप मजा येते. आज आपला चान्सय ! आज अब्बू गोष्ट वाचून दाखवणार. अलफाज अब्बू बसले होते तिथं आला. अब्बू बेडवर टेकून बसले होते. मांडीवर उशी होती व त्यावर पुस्तक ठेऊन ते वाचत होते. अलफाज आत आलेलंही त्यांच्या लक्षात नाही आलं. अलफाज हळूच आत आला.

“भौ...... !!! ” असं जोरात ओरडला. अब्बू एकदम दचकले. अलफाज खळाळून हसू लागला. अब्बुंच्या लक्षात आल्यावर ते ही जोरात हसू लागले. त्यांनी अलफाजला जवळ घेतलं अन त्याच्या गालाची पापी घेतली. अलफाजने नेहमीप्रमाणे तो गाल पुसून टाकला. अब्बू पुन्हा हसले.

“अब्बू... क्या पढ रहीं तुमे? ”

“अरे एक सुंदर पुस्तकय. तेच वाचतोय. तू काय वाचणार आज? ”

अलफाजला वाचता येत नाही तरी अब्बूनी त्याला प्रश्न विचारला.

“आज मैं ना कविता की किताब पढूंगा. ”

“ओके.. , चलो फिर अब शुरू करो पढना”

अलफाज पुस्तक घेऊन आला. तो अब्बुसारखं टेकून बसला व एक उशी मांडीवर घेऊन त्यावर पुस्तक ठेऊन वाचायला लागला.

“हां, अब्बू सुनो. ”

हातात पुस्तक घेऊन अब्बू जसं वाचून दाखवतात तसंच करत अलफाज वाचू लागला.

‘ये आज्जी कुठं चालली?

गावाला !! जा जा..... ’

‘ये आज्जी काय काय खाती?

भाजी-रोटी !!! खा खा..... ’

अलफाज कविता वाचत होता अन अब्बू त्याच्याकडे कौतुकाने पाहत होते. अलफाजची कविता वाचून झाली.

“अब्बू, अब तुमे पढ के दिकाव ! ”

अलफाज अब्बुंच्या मांडीवर डोकं ठेऊन झोपला. अब्बूनी पुस्तक घेतलं व अलफाजची आवडती विंदा करंदीकरांची कविता “नकटी राणी’ वाचायला सुरवात केली.

“सून बिट्टू, कवितेचे नाव : नकटी राणी. ” नाव ऐकताच अलफाज पुन्हा गालातल्या गालात हसला. अब्बुनी सुरवात केली.

नकट्या देशाची
नकटी राणी.
नकटा प्रधान
फार इमानी.

नकटी राणी
नाकात हसते.
नकटी मनी
मांडीवर बसते.

तिघे मिळून
खेळतात रमी.
नकट्या नाकात
शेंबुड कमी.

कविता ऐकून अलफाज हसतच सुटला. बराच वेळ वाचून झाल्यावर अब्बुंच्या लक्षात आलं अलफाज झोपी गेलाय. त्यांनी त्याला नीट झोपवलं आणि स्वत: पुस्तक वाचत बसले.


अलफाज अजूनही झोपेत हसत होता. अब्बू त्याला पाहून मनोमन हसत होते.

“नकटी राणी स्वप्नात आली वाटतं..... !! ” असं मनाशीच म्हणत अब्बू पुस्तक वाचण्यात रमून गेले.

[कविता साभार : अजबखाना, विंदा करंदीकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. ]

.....................................................................

# लेखक परिचय




## फारूक सय्यदलायकअल्ली काझी.

**नाझरा, ता. सांगोला, जि. सोलापूर ४१३३०८**

**9921380966**

**farukskazi82@gmail. com**


- **इयत्ता दुसरीच्या (मराठी) बालभारती पाठ्यपुस्तकात 'मला वाटते' हा पाठ समाविष्ट.**
- **'शिकण्याच्या वाटेवरचं आनंदवन' (२०१४) (शिक्षक –पालक)**
  -दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर 'विशेष साहित्य पुरस्कार-२०१५.
  - बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर पुरस्कार -२०१५
- **'मित्र' (मुलांसाठी) २०१६**
  - राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य सम्मेलन, सांगली. (२०१७) प्रयोगशील राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार.

मुखपृष्ठ व आतील सजावट : योगिता धोटे, मुंबई

सुलेखन : प्रवीण लोहार, मुंबई

आभार : मासिक ऋग्वेद, आजरा. (कोल्हापूर)

प्रकाशन दिनांक : २१ ऑक्टोबर २०१७ (अलफाजचा सातवा वाढदिवस)

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यांच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे मार्केटिंग करा. एकदम फ़्रंट फ़ुटवर येऊन खेळू.

जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahitya. com

esahity@gmail. com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ़्री वाचा.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फ़ुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट. कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.